# विद्यार्थी शिष्यवृत्तीविनाच

## 'महाडीबीटी पोर्टल'वर शुल्क पडताळणीवरून सरकारी विभागांमध्ये टोलवाटोलवी

harsh.dudhe
@timesgroup.com
Tweet : @harshdudhe_MT



"राज्य सरकारच्या 'एफआरए' आणि 'महाआयटी'ने या विषयी तातडीने तोडगा काढण्याची गरज आहे. केंद्र सरकारने त्यांच्या हिश्श्यातील शिष्यवृत्तीची रक्कम राज्य सरकारला दिली. मात्र, शुल्क पडताळणी कोण करणार, या मुद्द्यावर टोलवाटोलवी सुरू आहे.
– रामदास झोळ, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिट्यूट्स इन रूरल एरिया

**पुणे :** 'महाडीबीटी पोर्टल'वर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्कांची पडताळणी कोणी करावी, याबाबत निर्णय होत नसल्याने राज्यातील शेकडो विद्यार्थी आणि महाविद्यालये शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२मधील शुल्काची पडताळणी होत नसल्याने, महाविद्यालयांना अभ्यासक्रमांचे शुल्क 'महाडीबीटी पोर्टल'वर भरता येत नसल्याचे चित्र आहे. या प्रकारामुळे राज्य सरकारच्या विभागांमध्ये समन्वय नसल्याचे दिसून आले आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल) तंत्रशिक्षण संचालनालय (डीटीई), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (डीएमईआर), उच्च शिक्षण संचालनालय (डीएचई), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद (एमसीईएआर), महाराष्ट्र राज्य नर्सिंग आणि पॅरामेडिकल शिक्षण मंडळाचे (एमएसबीएनपीई) पदवी, पदविका, आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येतात. या प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची शिष्यवृत्ती; तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या राजर्षी शाहू शुल्क प्रतिपूर्ती योजनेद्वारे शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते. त्यासाठी 'महाडीबीटी पोर्टल'ची निर्मिती केली आहे. ही शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी अभ्यासक्रमांच्या शुल्काची माहिती सरकारच्या 'महाडीबीटी पोर्टल'वर पाहिजे. मात्र, अभ्यासक्रमांच्या शुल्काची पडताळणी पूर्ण न झाल्याने शिष्यवृत्तीची प्रक्रिया रखडली आहे.

'शुल्क नियामक प्राधिकरण'कडून (एफआरए) अभ्यासक्रमांची शुल्कनिश्चिती होते. त्याचप्रमाणे 'एफआरए'कडून गेल्या शैक्षणिक वर्षापर्यंत 'महाडीबीटी पोर्टल'वर शुल्काची पडताळणी करण्यात येत होती. मात्र, यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून 'एफआरए'ने शुल्क पडताळणी करण्यास नकार दिला. 'एफआरए'चे काम व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्याचे; तसेच निश्चित करण्याचे आहे. कॉलेजांनी 'महाडीबीटी पोर्टल'वर नेमके कोणते शुल्क भरले आहे, याची पडताळणी संबंधित अभ्यासक्रमाच्या मंडळ किंवा संचालनालयाने करावी, असे स्पष्टीकरण 'एफआरए'चे अध्यक्ष आणि माजी न्यायमूर्ती विजय अचलिया दिले. त्यावर 'महाडीबीटी पोर्टल'ची जबाबदारी असणाऱ्या, 'महाआयटी'नेही 'एफआरए'ला पत्र लिहिले आहे. त्यानुसार 'महाडीबीटी पोर्टल'वर शिष्यवृत्ती प्रक्रिया १४ नोव्हेंबरपासून सुरू झाली. पोर्टलच्या कार्यप्रणालीनुसार यंदाच्या वर्षासाठी 'एफआरए'ने शुल्काची पडताळणी करावी, अशी विनंती केली आहे. पुढील २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून कार्यप्रणालीत आवश्यक बदल करण्याचा निर्णय बैठकीत चर्चेद्वारे घेण्यात येईल, असे सूतोवाच केले आहे.

# मलिक यांच्या सुटकेसाठी तीन कोटींची मागणी

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील महाविकास आघाडीतील मंत्री नवाब मलिक यांच्या सुटकेसाठी एका व्यक्तीने तीन कोटी रुपये मागितल्याचा दावा त्यांचा मुलगा आमीर याने केला आहे. इम्तियाझ नावाच्या व्यक्तीने दुबई येथून ईमेल करून बिटकॉइनच्या स्वरूपात तीन कोटी दिल्यास मलिक यांना कोठडीतून बाहेर काढण्यास प्रयत्न करू, असे म्हटले आहे. आमीर याच्या तक्रारीवरून विनोबा भावेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नवाब मलिक यांच्या मुलाचा दावा; गुन्हा दाखल**

मनी लॉंडरिंग प्रकरणात नवाब मलिक यांना ईडीने अटक केली असून, सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्या जामिनासाठी कुटुंबीयांकडून न्यायालयात दाद मागितली जात आहे. जामिनासाठी, तसेच गुन्हा रद्द करण्यासाठी न्यायालयांमध्ये प्रयत्न सुरू असल्याचे कळताच नवाब मलिक यांचा मुलगा आमीरला एक मेल आला आहे. यामध्ये नवाब मलिक यांच्या अटकेचा संदर्भ देण्यात आला असून, इम्तियाझ नावाच्या व्यक्तीने हा मेल पाठवला आहे. मलिक यांच्या जामिनासाठी आम्ही न्यायालयात प्रयत्न करू, परंतु त्यासाठी बिटकॉइनच्या स्वरूपात तीन कोटी रुपये द्यावे लागतील, असे मेलमध्ये नमूद करण्यात आले आहे.

हा मेल आल्याचे लक्षात येताच आमीर याने पोलिसांत धाव घेतली. त्याने दिलेल्या तक्रारीवरून विनोबा भावेनगर पोलिसांनी फसवणूक, तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आमिर यांच्या मेलमधील तपशील, तसेच इतर तांत्रिक माहितीच्या आधारे तो पाठवणाऱ्याचा शोध घेतला जात असल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. हा खोडसाळपणा आहे का अन्य काही? हे तपासानंतरच स्पष्ट होईल, असे पोलिसांनी म्हटले आहे.

# एकत्रित मात्रांचा टप्पा १५ कोटी

**मुंबई :** राज्य सरकारच्या करोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेने एकत्रितपणे १५.८२ कोटी मात्रांचा टप्पा गाठला आहे. आरोग्यविभागाच्या माहितीनुसार १८ ते ४४ वयोगटातील ४,८८,२८,६४८ लाभार्थ्यांना लशीची पहिली मात्रा तर दुसरी मात्रा ३,७२,४६,५२४ इतक्या लाभार्थ्यांना देण्यात आली आहे. साठ वर्षांवरील १,३३,०६,१२९ जणांनी पहिली तर १,०८,५९,१७४ जणांनी दुसरी मात्रा घेतली आहे. १०,१२,८४० लाभार्थ्यांनी बुस्टर मात्रा घेतल्याचे माहितीमधून स्पष्ट होत आहे.


आयुष मंत्रालय, भारत सरकार

**रा. रा. आ. पोदार केन्द्रीय आयुर्वेदीय अनुसन्धान संस्थान, मुंबई**
**केन्द्रीय आयुर्वेदीय विज्ञान अनुसन्धान परिषद**
**आयुष मंत्रालय, भारत सरकार**

**सार्वजनिक सूचना**

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयातर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा अंतर्गत
**आयुष औषधांचे नि:शुल्क वितरण**

1. रोगप्रतिबंधक आयुर्वेदिक औषधे जसे कि,संशमनी वटी, अश्वगंधा घनवटी, आयु-रक्षा किट चे वितरण
2. रोगप्रतिबंधक आहार व जीवनशैली संबंधी दिशानिर्देशांच वितरण
3. कोविड-19 च्या व्यवस्थापनासाठी आयुर्वेदिक औषध'आयुष-64' च वितरण



**वितरण ठिकाण**
आर.आर.ए.पी. केंद्रीय आयुर्वेदीय अनुसन्धान संस्थान, मुंबई
(सी.सी.आर.ए.एस, आयुष मंत्रालय, भारत सरकार)
डॉ एनी बेसंट रोड,पोदार मेडिकल कॅम्पस,वर्ली,मुंबई-१८
दूरभाष क्रमांक: 022-24947822,ई मेल: acri-mumbai@gov.in


# पदवीनंतर 'पीएचडी'ला अनुमती

(पान १वरुन)

येईल, असा प्रस्ताव 'यूजीसी'ने आणला आहे. याबाबतचा मसुदा वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यावर ३१ मार्चपर्यंत सूचना मागविण्यात आल्या आहेत. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात बारावीनंतर पदवी शिक्षण घेत असताना प्रथम वर्षात ४० ते ४४ श्रेयांक मिळाल्यानंतर विद्यार्थी प्रमाणपत्र घेऊन शिक्षण सोडू शकतो किंवा पुढील इयत्तेमध्येही जाऊ शकतो. दुसऱ्या वर्षी ८० श्रेयांकासह शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी पदविकाधारक होऊन शिक्षण सोडू शकतो. तर, तिसऱ्या वर्षीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी पदवीधर होतो. या वर्षात विद्यार्थ्यांचा सीजीपीए ७.५ इतका असेल तर हा विद्यार्थी चौथ्या वर्षी अर्थात संशोधन किंवा ऑनर्स पदवीसाठी पात्र ठरतो आणि त्याने हे शिक्षण पूर्ण केल्यास त्याला ऑनर्सची पदवी मिळते. यामध्ये ज्या विद्यार्थ्यांचा सीजीपीए ७.५ इतका असेल ते विद्यार्थी पदव्युत्तर पदवी शिक्षण न घेता थेट 'पीएचडी' अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात.

विद्यापीठ अनुदान आयोगाने 'पीएचडी पदवीची प्रमाणित पद्धत निश्चित करणारे नियमन २०२२'चा मसुदा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये हे बदल सुचविण्यात आले आहेत. याचबरोबर आयोगाने चार वर्षे ऑनर्स आणि संशोधनासह पदवीचा मसुदाही प्रसिद्ध केला आहे. यानुसार केंद्रीय विद्यापीठे शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून चार वर्षे पदवी शिक्षण देण्याची तयारी सुरू करत आहेत. या मसुद्यानुसार चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे १६० ते १७६ श्रेयांक असणे आवश्यक आहे. चार वर्षे शिक्षण घेऊन पदवी घेतलेल्या विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवी शिक्षण घ्यायचे असेल तर त्याला एका वर्षात हे शिक्षण घेण्याची मुभा आहे. तर, तीन वर्षांनंतर पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला दोन वर्षे पदव्युत्तर पदवी शिक्षण घ्यावे लागणार आहे. पदवी शिक्षणादरम्यान प्रत्येक श्रेयांकासाठी ४५ तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे. हा अभ्यासक्रम वर्गशिक्षण, प्रात्यक्षिक शिक्षण, इंटर्नशिप, सेमिनार्स, सामाजिक सेवा अशा विविध भागांमध्ये विभागला गेला आहे. तर, सर्व पदवी शिक्षणासाठी आता काही समान विषय असणार आहेत. यामध्ये इंग्रजीसह स्थानिक भाषा, पर्यावरण, भारताची ओळख, डिजिटल शिक्षण, गणित आणि कम्प्युटेशनल थिंकिंग, आरोग्य, योग अशा विषयांचा समावेश असणार आहे.

# सायकलस्वाराचा फुग्यामुळे मृत्यू

(पान १वरुन)

लाकडे आणायला गेलेल्या एका गाडीतून काही मुले पाण्याने भरलेले फुगे रस्त्यावर फेकून मारत होते. त्यातील एक फुगा विरारच्या दिशेने जाणाऱ्या धीरज बुरुड या दुचाकीस्वाराला लागला. त्यामुळे धीरजचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि सायकलवरून जात असलेल्या रामचंद्र यांना दुचाकी धडकली. आगाशी चाळपेठ परिसरात घडलेल्या या विचित्र अपघातात रामचंद्र यांचा जागीच मृत्यू झाला, असे ही घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच अर्नाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत रामचंद्र यांचा मृतदेह ताब्यात घेतला आणि दुचाकीस्वार धीरज याच्यावर गुन्हा दाखल केला. मात्र अपघाताचे नेमके कारण चौकशीनंतरच सांगितले जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

# गच्चीवरून पडून तरुणाचा मृत्यू

(पान १वरुन)

सुमारास आपल्या लहान भावासोबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यासमोरील एका नवीन इमारतीखाली उभा होता. यावेळी त्याचे काही मित्र रंग लावण्यासाठी आले असता अविनाश आणि त्याचा भाऊ समोरच्या इमारतीत पळाले. यावेळी अविनाशचा लहान भाऊ पहिल्या मजल्यावरच थांबला असता मित्रांनी त्याला रंग लावत इमारतीखाली आणले. त्याचवेळी इमारतीच्या गच्चीवरून अविनाश खाली पडल्याचा जोरदार आवाज आल्याचे अविनाशच्या भावाने सांगितले, अशी माहिती शिवाजीनगर पोलिसांनी दिली. मात्र अविनाशचा तोल कसा गेला, यावेळी गचीवर आणखी कोणी होते का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. या घटनेनंतर अविनाशचा मृतदेह उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर भोगे यांनी दिली.


# SANKALP SCHOOL

New Navy Nagar, Colaba, Mumbai 400005

**VACANCY NOTICE**

'Sankalp' is a school for differently-abled children located at Navy Nagar, Colaba, Mumbai and managed by the **Indian Navy**. The school caters for the needs of special children of defence personnel and helps them cope with the challenges of life.

1. Sankalp School, New Navy Nagar, Colaba is inviting applications for the following posts:

**DETAILS OF POST: OCCUPATIONAL THERAPIST**

**Essential Qualification:** (i) Masters / Bachelor in Occupational Therapy (MOT / BOT) from a recognised university. (ii) Experience in dealing with special needs children will be an added advantage.
**Timings:** Full Time

**DETAILS OF POST: SPEECH THERAPIST**

**Essential Qualification:** (i) Master / Bachelor of Science in Audiology and Speech Language Pathology (MASLP / BASLP) from a recognised university. (ii) Experience in dealing with special needs children will be an added advantage.
**Timings:** Part Time (Two days in a week for 4 hours)

**DETAILS OF POST: DANCE TEACHER**

**Essential Qualification:** (i) 10+2 / Equivalent (ii) Training from recognised Institute / affiliated to a University. (iii) Preference will be given to candidates having experience in teaching special needs children.
**Timings:** Part Time (Once in a week for one hour)

2. Interested applicants are required to forward their resume on email id: sankalpnwwa@gmail.com on or before 29 March 2022.
3. The interview of only shortlisted candidates will be conducted on 31 March 2022. Timings of the same will be informed to candidates telephonically and by email. Candidates are required to bring their original documents during interview for verification.
4. For any further queries, please contact Mrs. Archana, email id: psyphd2020@gmail.com


# दुचाकीस्वारांसाठी रविवार आनंदवार

(पान १वरुन)

तक्रारी वाहतूक कोंडी आणि मोकळ्या रस्त्यांबाबत आहेत. म्हणूनच खटारा वाहने हटविण्याची मोहीम, विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, नियमांचे पालन करण्यासाठी डिलिव्हरी बॉयना ताकीद, रिक्षा-टॅक्सी चालकांना सूचना अशा वेगवेगळ्या मार्गांद्वारे वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मुंबईत आठवड्यातील सर्वच दिवशी रस्त्यांवर खूप वाहने असतात. त्यामुळे संजय पांडे यांनी 'हॅपी संडे' ही योजना आणली आहे. या योजनेंतर्गत मुंबई शहर आणि उपनगरांतील दहा प्रमुख आणि मोठ्या रस्त्यांची निवड करण्यात येणार आहे. या दहा रस्त्यांवर दर रविवारी सकाळी दोन तास आणि संध्याकाळी दोन तास वाहतूक बंद ठेवण्यात येईल. रस्त्याची एक बाजू दुचाकीस्वारांसाठी आणि दुसरी बाजू सायकलस्वार आणि लहान मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेला मुंबईकरांचा कसा प्रतिसाद मिळतो हे पाहून ती कायम ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

# नवाब मलिक बिनखात्याचे मंत्री

(पान १वरुन)

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी मुंबईत पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन मलिक यांच्याकडील मंत्रिपद कायम ठेवण्याची भूमिका घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी ही बैठक झाली. राष्ट्रवादीचे नेते खा. प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, खा. सुप्रिया सुळे बैठकीला हजर होत्या. या बैठकीत मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबई राष्ट्रवादी काँग्रेसची नवीन पदाधिकारी नियुक्ती, विरोधकांची मलिक यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी, विधानसभेतील पेन ड्राइव्ह प्रकरणावरही चर्चा झाल्याचे समजते. मलिक यांच्या अनुपस्थितीत मुंबई राष्ट्रवादी काँग्रेसला दोन नवे कार्याध्यक्ष दिले जातील. यासाठी नरेंद्र राणे आणि राखी जाधव यांची नावे चर्चेत आहेत. परभणीचे नवे पालकमंत्री धनंजय मुंडे, तर गोंदियाचे पालकमंत्री राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे असतील. नवाब मलिक आणि अनिल देशमुख यांना चुकीच्या पद्धतीने डांबून ठेवण्यात आले आहे. जोपर्यंत त्यांना न्याय मिळणार नाही तोपर्यंत ही पर्यायी व्यवस्था आहे. मलिक हे बिनखात्याचे मंत्री म्हणून राहतील. मलिक यांचा राजीनामा घेणार नाही, असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.


# भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन नंबर (CIN): L23220MH1952GOI008931
नोंदणीकृत कार्यालय : भारत भवन, पी. बी. नं. ६८८, ४ आणि ६ करीमभॉय रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – ४००००१.
फोन नं. : २२७१ ३००० / ४००० ई-मेल : info@bharatpetroleum.in वेबसाइट : www.bharatpetroleum.in

## पोस्टाद्वारे मतदानाची सूचना

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (''कंपनी'')च्या सदस्यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपन्या कायदा, २०१३ मधील कलम १०८ आणि ११० (''कायदा'') आणि त्या अंतर्गत नमूद करण्या आलेल्या नियमांच्या अन्वये, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाची सर्वसाधारण परिपत्रके क्र.१४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२० आणि २०/२०२१ दिनांक ८ डिसेंबर २०२१, व त्याचबरोबर इतर संबंधित परिपत्रकांसोबत (येथून पुढे एकत्रितपणे ''एमसीएची परिपत्रके''असे संबोधण्यात येईल) वाचले असता सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग व प्रगटिकरणाच्या आवश्यकता) नियम, २०१५ (सेबी एलओडीआर) अन्वये कंपनी पोस्टाद्वारे मतदानाची सूचनेत (''सूचना'') दिनाक १७ मार्च, २०२२ मध्ये नमूद केलेले खालील ठराव मंजूर करण्यासाठी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने (''ई-मतदान/दूरस्थ ई-मतदान'') आपल्या सदस्यांची मंजुरी मागवित आहे:

| मुद्दा क्रमांक | ठराव | ठरावाचा तपशील |
|---|---|---|
| १. | सामान्य ठराव | आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये फलकॉन ऑईल अँण्ड गॅस बी.व्ही. सोबत मटेरियल रिलेटेड पार्टी व्यवहार करण्यासाठी मंजुरी |
| २. | सामान्य ठराव | आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेड सोबत मटेरियल रिलेटेड पार्टी व्यवहार करण्यासाठी मंजुरी |
| ३. | सामान्य ठराव | आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये पेट्रोनेट एलएनजी लिमिटेड सोबत मटेरियल रिलेटेड पार्टी व्यवहार करण्यासाठी मंजुरी |
| ४. | सामान्य ठराव | श्री. गुडे श्रीनिवास यांची संचालक पदावर नेमणूक करणे |
| ५. | सामान्य ठराव | श्री. संजय खन्ना यांची संचालक (रिफायनरीज) ह्या पदावर नेमणूक करणे |
| ६. | सामान्य ठराव | श्री. सुमन बिल्ला यांची संचालक पदी नेमणूक करणे |
| ७. | विशेष ठराव | श्री. प्रदीप विश्वंभर अग्रवाल यांची स्वतंत्र संचालक पदी नेमणूक करणे |
| ८. | विशेष ठराव | श्री. घनश्याम शेर यांची स्वतंत्र संचालक पदी नेमणूक करणे |
| ९. | विशेष ठराव | डॉ. (श्रीमती) ऐस्वर्या बिसवाल यांची स्वतंत्र संचालक पदी नेमणूक करणे |
| १०. | विशेष ठराव | प्रोफे. (डॉ.) भगवती प्रसाद सारस्वत यांची स्वतंत्र संचालक पदी नेमणूक करणे |
| ११. | विशेष ठराव | श्री. गोपाळ कृष्ण अग्रवाल यांची स्वतंत्र संचालक पदी नेमणूक करणे |

वर नमूद करण्यात आलेल्या तरतुदी आणि ह्या संदर्भात जारी करण्यात आलेली एमसीएची परिपत्रके आणि सेबी एलओडीआर, नियम ४४ ची पूर्तता करताना, सूचना फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आली आहे आणि मेसर्स नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') द्वारा दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचबरोबर, कंपनी /डिपॉझिटरीज यांचेकडे ज्यांचा ई-मेलचा अॅड्रेस नोंदविले आहेत आणि अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे शुक्रवार, ११ मार्च, २०२२ रोजी ज्यांची नावे कंपनीच्या सदस्यांच्या रजिस्टरवर आणि डिपॉझिटरीज यांचेकडील लाभधारक मालकांच्या रजिस्टरवर नोंदविण्यात आली आहेत अशा सदस्यांना गुरूवार, १७ मार्च, २०२२ रोजी सूचना पाठविण्यात आली आहे. त्यानुसार, ह्या पोस्टाद्वारे मतदानासाठी सदस्यांना सूचनेची छापील प्रत व पोस्टाद्वारे मतपत्रिका व पैसे भरलेले व्यावसायिक उत्तराचे पाकिट पाठविण्यात आलेले नाही.

कंपनीच्या वेबसाईटवर www.bharatpetroleum.in येथे, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (एनएसडीएल) यांच्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे, आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेड, आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड, यांच्या वेबसाईटसवर देखील अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे सूचना व ई-मतदानासंबंधी सूचना उपलब्ध आहेत..

दूरस्थ मतदानाच्या प्रक्रियेशी संबंधित तारखांची संक्षिप्त माहिती खाली देण्यात आली आहे:

| | |
|---|---|
| दूरस्थ ई-मतदानाची अंतिम मुदतीची तारीख | शुक्रवार, ११ मार्च, २०२२ |
| दूरस्थ ई-मतदानाचा प्रारंभ | शनिवार, १९ मार्च, २०२२, रोजी सकाळी ०९:०० वाजता (भाप्रवेळ) |
| दूरस्थ ई-मतदान संपेल | रविवार, १७ एप्रिल, २०२२, रोजी सायंकाळी ०५:०० वाजता (भाप्रवेळ) |
| दूरस्थ ई-मतदानाचे निकाल | मंगळवार, १९ एप्रिल, २०२२, रोजी भाप्रवेळ सायंकाळी ०५:०० वाजता किंवा तत्पुर्वी |
| दूरस्थ ई-मतदानाचा संख्या क्रमांक | समान – ११९५९१ |

टीपा:

१. कृपया याची नोंद घ्यावी की, रविवार, १७ एप्रिल, २०२२, रोजी सायंकाळी ०५:०० वाजता (भाप्रवेळ) एनएसडीएल द्वारा ई-मतदानाचे मॉड्यूल बंद करण्यात येईल.
२. पोस्टाद्वारे मतदानाच्या प्रक्रियेच्या संदर्भात ज्या सदस्यांना तक्रार असेल त्यांनी ती ssc@bharatpetroleum.in येथे ई-मेलद्वारे पाठवावी. www.bharatpetroleum.in येथील इन्व्हेस्टर भागातून देखील सूचना डाऊनलोड करता येईल.
३. ई-मतदानासंबंधी काही तक्रार/चौकशी असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com येथील डाऊनलोड भागात उपलब्ध असलेले भागधारकांच्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि भागधारकांची ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक: १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० येथे संपर्क साधू शकता किंवा श्रीमती पल्लवी म्हात्रे, मॅनेजर, एनएसडीएल, ४था मजला, 'ए' विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०००१३ येथे evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवू शकता.
४. ज्यांनी त्यांचा ई-मेलचा अॅड्रेस नोंदविला नाही अशा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात समभाग धारण केलेल्या सदस्यांना त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींमार्फत डिपॉझिटरीकडे आणि ज्यांनी छापील स्वरूपात समभाग धारण केले आहेत अशा सदस्यांना कंपनीचे आरटीए, मेसर्स डीएसआरसी यांना फोलिओ क्रमांकाच्या तपशीलासह आणि पॅनकार्डाची स्वयंप्रमाणित प्रत जोडून लेखी लिहून त्याची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
५. ज्यांनी अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे शुक्रवार, ११ मार्च, २०२२ रोजी समभाग धारण केले आहेत असे सदस्य कंपनीच्या वेबलिंकवर: https://www.bharatpetroleum.in/bharat-petroleum-for/investors/shareholders-information/postal-ballot.aspx येथे क्लिक करून पोस्टाद्वारे मतदानाची सूचना उपलब्ध करून घेऊ शकतील आणि दूरस्थ ई-मतदानासासाठी यूजर आयडी व पासवर्ड मिळविण्यासाठी नोटिसमधील टिपांमध्ये दिलेल्या सूचना पाहू शकतील.
६. पोस्टाद्वारे मतदानाची प्रक्रिया न्याय्य व पारदर्शकतेने व्हावी यासाठी कंपनीने श्रीमती रागिणी चोक्शी, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी यांची स्क्रुटिनायजर म्हणून नेमणूक केली आहे.

कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, मंगळवार, १९ एप्रिल, २०२२, रोजी सायंकाळी ०५:०० वाजता किंवा तत्पुर्वी पोस्टाद्वारे मतदानाचे निकाल घोषित करण्यात येतील. सदर निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.bharatpetroleum.in येथे किंवा एनएसडीएलच्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com देखील अपलोड करण्यात येतील आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटसवर म्हणजे बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड, यांच्या वेबसाईटसवर अनुक्रमे www.bseindia.com येथे आणि www.nseindia.com येथे देखील उपलब्ध असतील.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड करिता

सही/–
(व्ही. कला)
कंपनी सचिव

दिनांक : १७ मार्च २०२२
स्थळ : मुंबई

Energising Lives. Energising Naya Bharat



# भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

प्रपत्र क्रमांक: सीएए.२

[कंपन्या कायदा, २०१३ मधील कलम २३०(३) आणि कंपन्या (तडजोड, व्यवस्था आणि विलिनिकरण) कायदा, २०१६ मधील नियम ६ व ७ अन्वये]

**कंपनी योजना याचिका**

**भारत ओमान रिफायनरीज लिमिटेड चे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या विलिनिकरणाच्या योजनेच्या प्रकरणी**

**भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड**, भारतीय कंपनी कायदा, १९१३ अंतर्गत स्थापन करण्यात आलेली कंपनी, जिचा ओळख क्रमांक: एल२३२२०एमएच१९५२जीओआय००८९३१ असून त्यांचे नोंदणीकृत कार्यालय भारत भवन, पीबी ६८८, ४ व ६, करिमभॉय रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१, महाराष्ट्र, भारत येथे आहे ) ... याचिकाकर्ता कंपनी / हस्तांतरण करून घेणारी कंपनी

**याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या सभेची सूचना आणि सूचनेची जाहिरात**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार (**''एमसीए''**) यांनी आदेश दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ (**''एमसीएचा आदेश''**) अन्वये, कंपनी कायदा, २०१३ मधील कलम २३० ते २३२ आणि लागू तरतदींच्या अंतर्गत (**''कायदा''**) भारत ओमान रिफायनरीज लिमिटेड चे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि त्यांचे संबंधित भागधारक यांचे विलिनिकरण करण्याच्या योजनेला (**''योजना''**), दुरूस्तीसह किंवा त्याशिवाय, मंजुरी देण्यासाठी, एमसीएच्या आदेशातील अटींनुसार वर नमूद केलेल्या सभेच्या चेअरपरसन यांनी निश्चित केलेल्या, येथे पुढे नमूद केलेल्या तारीख व वेळी, याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांची सभा बोलाविण्याचे निर्देश दिले आहेत.

एमसीएच्या आदेशान्वये आणि कायद्यातील लागू तरतुदी, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंगच्या जबाबदाऱ्या आणि प्रगटिकरणाच्या आवश्यकता) नियम, २०१५ (**''लिस्टिंगचा कायदा''**) आणि सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२०, २२/२०२० दिनांक १५ जून २०२०, ३३/२०२० दिनांक २८ सप्टेंबर २०२०, ३९/२०२० दिनांक ३१ डिसेंबर, २०२०, १०/२०२० दिनांक २३ जून २०२१ आणि २०/२०२१ दिनांक ८ डिसेंबर २०२१ (एकत्रितपणे **''एमसीएची परिपत्रके''** असे संबोधण्यात येईल) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (**''सेबी''**) द्वारा जारी करण्यात आलेले परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांक १२ मे २०२०, आणि सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांक १५ जानेवारी २०२१ (एकत्रितपणे **''सेबीची परिपत्रके''** असे संबोधण्यात येईल) सोबत वाचले असता सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२० च्या लागू तरतुदींचे पालन करून यांची पूर्तता करताना, याद्वारे अधिक सूचना देण्यात येत आहे की, याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या सभा खालील प्रमाणे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**''व्हीसी''**) इतर ऑडिओ व्हिज्युअल (**''ओएव्हीएम''**) द्वारा घेण्यात येतील:

| अनु.क्र. | सभेची श्रेणी | सभेची तारीख | सभेची वेळ |
|---|---|---|---|
| १. | इक्विटी भागधारक | गुरूवार, २१ एप्रिल २०२२ | सकाळी १०.०० वाजता भाप्रवेळ |
| २. | सुरक्षित क्रेडिटर्स | गुरूवार, २१ एप्रिल २०२२ | दुपारी १२.०० वाजता भाप्रवेळ |
| ३. | असुरक्षित क्रेडिटर्स | गुरूवार, २१ एप्रिल २०२२ | दुपारी १.३० वाजता भाप्रवेळ |

कायद्यातील कलम १०२ सोबत वाचले असता कलम २३० आणि २३२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदी आणि कंपन्या (तडजोड, व्यवस्था आणि विलिनिकरण) कायदा, २०१६ (**''सीएए नियम''**) मधील नियम ६ अन्वये योजना आणि विवरणाची प्रत, आणि सोबतचे दस्तऐवज यासह वरील सभेची व्यक्तिगत सूचना, (ए) ज्यांच्या ई-मेल आयडी याचिकाकर्ता कंपनी / डिपॉझिटरी सहभागी / रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (**''आरटीए''**) यांचेकडे नोंदविण्यात आल्या आहेत अशा इक्विटी भागधारकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे आणि ज्यांचे ईमेल अॅड्रेसेस याचिकाकर्ता कंपनीपाशी नोंदविण्यात आले नाहीत अशा इक्विटी भागधारकांना स्पीड पोस्ट आणि रजिस्टर्ड पोस्टाने, जसे असेल त्याप्रमाणे, आणि (बी) ज्यांच्या ई-मेल आयडी याचिकाकर्ता कंपनी / डिपॉझिटरी सहभागी / आरटीए यांचेकडे नोंदविण्यात आल्या आहेत, जसे असेल त्याप्रमाणे, अशा सुरक्षित क्रेडिटर्सना, आणि ज्यांचे ईमेल अॅड्रेसेस याचिकाकर्ता कंपनी / डिपॉझिटरी सहभागी / आरटीए यांचेकडे नोंदविण्यात आले नाहीत अशा सुरक्षित क्रेडिटर्सना स्पीड पोस्ट आणि रजिस्टर्ड पोस्टाने, जसे असेल त्याप्रमाणे, अगोदरच पाठविण्यात आले आहेत.

कायद्यातील कलम १०२ सोबत वाचले असता कलम २३० आणि २३२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदी आणि सीएए नियमातील नियम ६ अन्वये योजना आणि विवरणाची प्रत, आणि सोबतचे दस्तऐवज यासह वरील सभेची व्यक्तिगत सूचना, (ए) ज्यांच्या कर्जाचे मूल्य रूपये ५ कोटी पेक्षा अधिक आहे आणि ज्यांच्या ई-मेल आयडी याचिकाकर्ता कंपनी / डिपॉझिटरी सहभागी / आरटीए यांचेकडे उपलब्ध आहेत अशा असुरक्षित क्रेडिटर्सना आणि (बी) ज्यांचे ईमेल अॅड्रेसेस याचिकाकर्ता कंपनी / डिपॉझिटरी सहभागी / आरटीए यांचेकडे उपलब्ध नाहीत अशा असुरक्षित क्रेडिटर्सना स्पीड पोस्ट आणि रजिस्टर्ड पोस्टाने, जसे असेल त्याप्रमाणे, अगोदरच पाठविण्यात आले आहेत.

कायद्यातील कलम १०२ सोबत वाचले असता कलम २३० आणि २३२ आणि कायद्यातील इतर लागू तरतुदी आणि सीएए नियमातील नियम ६ अन्वये योजना आणि विवरणाची प्रत, यासह वरील सभेची सूचना, याचिकाकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.bharatpetroleum.in येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेड आणि एनएसई लिमिटेड यांच्या वेबसाईटसवर अनुक्रमे www.bseindia.com येथे आणि www.nseindia.com येथे आणि सिंगापूर स्टॉक एक्सचेंज यांच्या वेबसाईटसवर www.sgx.com येथे प्रदर्शित करण्यात आले आहेत आणि वरील सभेचे आयोजन करण्यासाठी याचिकाकर्ता कंपनीद्वारा ई-मतदान आणि इतर सुविधा देण्यासाठी नेमण्यात आलेली एजन्सी या नात्याने नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरीज लिमिटेड (**''एनएसडीएल''**) यांच्या वेबसाईटवर (www.evoting.nsdl.com) येथे प्रदर्शित करण्यात आले आहेत.

याचिकाकर्ता कंपनीने आपले इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांना वरील सूचना व त्यासोबतचे दस्तऐवज पाठविण्याचे / ट्रान्समिट करण्याचे काम पूर्ण केले आहेत.

एमसीएने पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार मधील डॉ. नवनीत कोठारी, जॉइंट सेक्रेटरी (मार्केटिंग) यांची इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या सभेचे चेअरपरसन म्हणून नेमणूक केली आहे. श्री. नृपांग ढोलकिया, नियुक्त पार्टनर (सी.पी. क्र. १२८८४) आणि त्यांच्या अनुपस्थितीत श्री. विश्वेश भगत, नियुक्त पार्टनर (सी.पी. क्र. २५३८७), ढोलकिया अँण्ड असोसिएटस, एलएलपी, प्रक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज, हे याचिकाकर्ता कंपनीचे सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या सभेचे स्क्रुटिनायजर म्हणून काम पाहतील तर श्रीमती रागिणी चोक्शी, नियुक्त पार्टनर (सी.पी. क्र. १४३६), रागिणी चोक्शी अँण्ड कंपनी, ह्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारकांच्या सभेच्या स्क्रुटिनायजर म्हणून काम पाहतील.

वरील सभेत वरील योजना मंजुर करण्यात आल्यास, ती त्यानंतर एमसीएच्या मंजुरीच्या आणि नियामक किंवा इतर प्राधिकाऱ्यांच्या अशा इतर मंजुऱ्या, परवानग्या, आणि मान्यतांच्या, आवश्यक असेल त्याप्रमाणे यांच्या अधीन असेल.

याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या सभा व्हीसी /ओएव्हीएम द्वारा होणार असल्यामुळे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीची आवश्यकता नाही. त्यानुसार, याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्यासाठी संबंधित सभांसाठी प्रॉक्सिजची नेमणूक करण्याची सुविधा उपलब्ध नसेल.

अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे १४ एप्रिल २०२२ ह्या तारखेला ज्यांची नावे याचिकाकर्ता कंपनीच्या सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये असतील अशा व्यक्ती सूचनेत प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्याचे/तिचे/त्यांचे मतदान करण्याचा अधिकार बजावण्यास आणि इक्विटी भागधारकांच्या सभेस उपस्थित राहण्यास पात्र असतील. अंतिम मुदतीच्या तारखेला इक्विटी भागधारक नसलेली नसलेल्या व्यक्तीने ही सूचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे. इक्विटी भागधारकांचे मतदानाचे अधिकार हे अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे १४ एप्रिल २०२२ ह्या तारखेला त्यांच्या याचिकाकर्ता कंपनीतील भरणा केलेल्या इक्विटी समभाग भांडवलातील हिस्याच्या प्रमाणात असतील.

एमसीएच्या आदेशानुसार, ज्या व्यक्तींची नावे अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे ३० सप्टेंबर २०२१ ह्या तारखेला (ए) याचिकाकर्ता कंपनीच्या सुरक्षित क्रेडिटर्सच्या यादीत असतील आणि/किंवा (बी) ज्यांच्या कर्जाचे मूल्य रू. ५ कोटी पेक्षा अधिक आहे आणि ज्यांची नावे असुरक्षित क्रेडिटर्सच्या यादीत असतील अशा व्यक्ती सूचनेत प्रस्तावित असलेल्या ठरावांवर त्याचे/तिचे/त्यांचे मतदान करण्याचा अधिकार बजावण्यास आणि सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्सच्या संबंधित सभेस उपस्थित राहण्यास पात्र असतील. (ए) सुरक्षित क्रेडिटर आणि (बी) असुरक्षित क्रेडिटर (ज्यांच्या कर्जाचे मूल्य रू.५ कोटी पेक्षा अधिक आहे) नसलेल्या व्यक्तींनी ही सूचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे. सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्सचे मतदानाचे अधिकार हे अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे ३० सप्टेंबर २०२१ ह्या तारखेला याचिकाकर्ता कंपनीपाशी कर्जाऊ असलेल्या रकमेच्या प्रमाणात असतील.

वरील सभांसाठी ई-मतदानासाठी अंतिम मुदतीची तारीख आणि दूरस्थ मतदानाचा कालावधी खालील प्रमाणे आहे:

| इक्विटी भागधारकांची सभा | |
|---|---|
| ई-मतदानासाठी अंतिम मुदतीची तारीख | गुरूवार, १४ एप्रिल २०२२ |
| दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ | सोमवार, १८ एप्रिल २०२२ सकाळी ९:०० (भाप्रवेळ) |
| दूरस्थ ई-मतदान बंद होण्याची तारीख व वेळ | बुधवार, २० एप्रिल २०२२ सायंकाळी ५:०० (भाप्रवेळ) |

| सुरक्षित क्रेडिटर्सची सभा | |
|---|---|
| ई-मतदानासाठी अंतिम मुदतीची तारीख | गुरूवार, ३० सप्टेंबर २०२१ |
| दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ | सोमवार, १८ एप्रिल २०२२ सकाळी ९:०० (भाप्रवेळ) |
| दूरस्थ ई-मतदान बंद होण्याची तारीख व वेळ | बुधवार, २० एप्रिल २०२२ सायंकाळी ५:०० (भाप्रवेळ) |

| असुरक्षित क्रेडिटर्सची सभा | |
|---|---|
| ई-मतदानासाठी अंतिम मुदतीची तारीख | गुरूवार, ३० सप्टेंबर २०२१ |
| दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ | सोमवार, १८ एप्रिल २०२२ सकाळी ९:०० (भाप्रवेळ) |
| दूरस्थ ई-मतदान बंद होण्याची तारीख व वेळ | बुधवार, २० एप्रिल २०२२ सायंकाळी ५:०० (भाप्रवेळ) |

ई-मतदानाचा कालावधीच्या (वर नमूद केल्याप्रमाणे) अखेरीस, दूरस्थ मतदान सुविधा बंद करण्यात येईल. संबंधित सभेच्या ठिकाणी देखील इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी दूरस्थ पद्धतीने मतदान केलेले नाही असे संबंधित सभांना उपस्थित असलेले याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स संबंधित सभांमध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे त्यांचे मतदान करू शकतील.

इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स हे फक्त एकाच पद्धतीने म्हणजे दूरस्थ ई-मतदान किंवा संबंधित सभेत ई-मतदान पद्धतीने मतदान करू शकतील. जर एखाद्या इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर आणि असुरक्षित क्रेडिटरने दोन्ही पद्धतींनी मतदान केले तर तर दूरस्थ ई-मतदान पद्धतीने केलेले मतदानच फक्त वैध असेल आणि संबंधित सभांमध्ये केलेले मतदान ''अवैध'' ठरविण्यात येईल.

इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी संबंधित सूचनांमध्ये देण्यात आलेल्या सर्व नोटस काळजीपूर्वक वाचाव्यात.

संबंधित सभांच्या अगोदर किंवा त्या दरम्यान ज्यांना मदतीची गरज आहे असे याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांनी एनएसडीएल यांच्याशी evoting@nsdl.co.in येथे किंवा श्रीमती सरिता मोटे, असिस्टंट मॅनेजर – एनएसडीएल, राष्ट्रिय सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था मजला, कमला मिल्स कपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३ येथे टोल फ्री क्रमांक १८००-१०२०-९९०/ १८००-२२-४४-३० वर संपर्क साधावा.

ज्यांनी याचिकाकर्ता कंपनीकडे त्यांच्या ईमेल अॅड्रेसेसची नोंदणी / सुधारणा केलेली नाही अशा छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारकांना त्यांची याचिकाकर्ता कंपनीचे आरटीए, डेटा सॉफ्टवेअर रिसर्च कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (**''डीएसआरसी''**) यांना फोलिओ क्रमांकासह ई-मेल bpcl@dsrc-cid.in येथे लेखी कळवून आणि पॅनकार्डाची स्वयंप्रमाणित प्रत जोडून त्याची नोंदणी/सुधारणा करावी.

ज्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांच्या ईमेल अॅड्रेसेसची नोंदणी केलेली नाही अशा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या याचिकाकर्ता कंपनीच्या इक्विटी भागधारकांना, त्यांचे डिमॅट खाते ज्यांचेकडे आहे अशा डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांच्या ईमेलच्या अॅड्रेसेसची नोंदणी/सुधारणा करावी अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

ज्यांना योजनेसंबंधी माहिती हवी आहे किंवा वरील सभेत विचाराधीन असलेल्या मुद्यांसंबंधी माहिती हवी आहे अशा याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांना वरील सभेच्या किमान ७ दिवस अगोदर याचिकाकर्ता कंपनीला ssc@bharatpetroleum.in येथे ईमेल द्वारे लेखी विचारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

दिनांक : १७ मार्च २०२२
स्वाक्षरी/–
**डॉ. नवनीत मोहन कोठारी**
पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयातील जॉइंट सेक्रेटरी (एम), भारत सरकार
याचिकाकर्ता कंपनीचे इक्विटी भागधारक, सुरक्षित क्रेडिटर्स आणि असुरक्षित क्रेडिटर्स यांच्या सभांसाठी नेमण्यात आलेले चेअरपरसन

Energising Lives. Energising Naya Bharat